41
83

जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी जिल्हास्तरीय समिती {District Programme Implementation and Monitoring Committee} (Dist PIMC) गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्र.: अंश्रनि-२०२२/प्र.क्र.१४५/सामासु
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ जून, २०२२

वाचा: १) महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०१३.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. अंश्रनि-२०२०/ प्र.क्र. १८१/सामासु, मंत्रालय, दि. २ मार्च,२०२२

**प्रस्तावना :**

भारतीय समाजात रुजलेल्या काही अनिष्ट, अघोरी, अमानुष संस्कारातून रुजलेल्या अनेक प्रकारच्या गैरसमजुतीमुळे समाजाचे अतोनात नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे. लाखों माणसांचे जीव वाचविण्यासाठी त्यांचे होणारे शोषण व छळ थांबविण्यासाठी व समाजाचे मानसिक स्वास्थ सुधारण्यासाठी शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०१३ रोजी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०१३ जारी करण्यात आला आहे.

जादुटोणा विरोधी कायद्यामुळे लाखो माणसांचा होणारा छळ, शोषण व त्यांचे जीव वाचणार आहेत. त्याकरिता समाजप्रबोधन करुन महाराष्ट्र राज्यातील सामान्य जनतेच्या मनातील गैरसमजुती दूर करणे गरजेचे आहे. संस्कारातून रुजलेल्या गैरसमजुतीमुळे जातीयता, उच्चनिचता, गटपंथांमधील परस्पर द्वेष, स्त्री-पुरुष असमानता, दारिद्रय अशा मानवतेसाठी घातक असणाऱ्या गोष्टी विरोधी कायदा जनजागृती प्रचार कार्यक्रम अंमलबजावणी समितीची {Programme Implementation and Monitoring Committee (PIMC)} संदर्भांकित शासन निर्णय दि. २ मार्च, २०२२ अन्वये पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

जादुटोणा विरोधी कायदा प्रभावीपणे राबविण्याबाबत मा.मंत्री (सा.न्या.) महोदय यांच्या अध्यक्षतेखाली श्री.श्याम मानव, सह अध्यक्ष, पीआयएमसी यांच्यासमवेत दि. ५ एप्रिल,२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पीआयएमसी जिल्हा समिती गठीत करण्यात यावी, असे. मा.मंत्री (सा.न्या.) महोदय यांनी दिले.

त्यानुसार जिल्हा स्तरावर "जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती" नव्याने गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम-२०१३, दि ३० डिसेंबर, २०१३ रोजी जारी केलेला आहे. सदर कायद्याची परिणामकारक व योग्य अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावरील जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती (District Programme Implementation and Monitoring Committee) (Dist PIMC) पुढीलप्रमाणे नव्याने गठीत करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

जिल्हा स्तरावरील जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती {Programme Implementation and Monitoring Committee}(Dist PIMC)

| अ.क्र. | नाव व पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | पोलिस अधिक्षक | सदस्य |
| ३. | पोलीस आयुक्त, महसुल विभागाच्या मुख्यालयाबाहेरील महापालिका क्षेत्र | सदस्य |
| ४. | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ५. | शिक्षण अधिकारी प्राथमिक | सदस्य |
| ६. | शिक्षण अधिकारी माध्यमिक | सदस्य |
| ७. | जिल्हा व्यवसाय व तंत्रशिक्षण अधिकारी | सदस्य |
| ८. | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | सदस्य |
| ९. | प्रकल्प अधिकारी (संबंधित जिल्हयातील सर्व प्रकल्प (PO) | सदस्य |
| १०. | अशासकीय ७ सदस्य (त्यात किमान २ महिला) | सदस्य |
| ११. | जिल्हा समन्वयक | सदस्य |
| १२ | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग | सदस्य सचिव |

२. जिल्हा स्तर जादुटोणा विरोधी कायदा अंमलबजावणी प्रचार-प्रसार समितीची (Dist PIMC) कर्तव्ये :

१) जिल्हास्तरावरील/गावपातळीवर जादुटोणा विरोधी कायद्याच्या प्रचार-प्रसारासाठी नियोजन / आयोजन करणे. स्थळ निश्चिती, जाहिर सभा आयोजित करणे, प्रचार-प्रसार करणे, कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर प्रसिद्धी व इतर बाबी.

२) राज्य स्तर PIMC व विभागीय PIMC ने निर्देशित केलेले कार्यक्रम जिल्ह्यात राबविणे.

३) जिल्ह्यातील शासकीय अधिकाऱ्यांशी सहकार्य करणे,समन्वय निर्माण करणे

४) शाळा कॉलेजात व्याख्यान आयोजित करणे/ वक्ते पाठवणे/कार्यक्रम संपन्न करणे इ.बाबत नियोजन व अंमलबजावणी करणे.

३. सदर समितीतील अशासकीय सदस्यांची नियुक्ती, राज्यस्तरीय पीआयएमसी अध्यक्ष व सह अध्यक्ष यांच्या मान्यतेने व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या सहमतीने करण्यात यावी.

सदर समितीमध्ये जिल्हा समन्वयक नेमण्यासाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात यावेत. अंतिम निवड पीआयएमसी अध्यक्ष व सह अध्यक्ष यांच्या मान्यतेने व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या सहमतीने करण्यात यावी.

४. सदर समितीची बैठक वर्षातून किमान २ वेळा होईल. समितीतील अशासकीय सदस्यांना वित्त विभागाने निर्धारित केलेले भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.



Scanned with OKEN Scanner

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२२०६३०१६४२०१०६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

RAJENDRA NATHA SAVANE

Digitally signed by RAJENDRA NATHA SAVANE

(रा. ना. सवने)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे स्वीय सहाय्यक
४) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मुंबई
६) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
७) सर्व विभागीय आयुक्त
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी/सहायक आयुक्त, समाजकल्याण
१५) सर्व संबंधित जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती सदस्य.
१६) निवड नस्ती, सामासु.



Scanned with OKEN Scanner